# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सिद्धार्थ मनपा स. सा. रुग्णालय, गोरेगाव (पश्चिम)

## :स्थनिक जहिरात:

क्र. एचओ/1160 / एच. एम. जी. एच      दि.  12.08.2022

विषय :  सिद्धार्थ मनपा स. सा. रुग्णालयात अर्धवेळ दंतचिकित्सक ( Part Time Dentist) हया संवर्गातील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी स्थानिक जहिरात प्रदर्शित करण्याबाबत.

सिद्धार्थ मनपा सर्वसाधारण रुग्णालयातील "अर्धवेळ दंतचिकित्सक" याचे एक रिक्त पद तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून आवश्यक त्या कागदपत्रांसह विहित नमुन्यात अर्ज मागविणयात येत आहेत.

सर्वसाधारण अटी व शर्ती**:**

(1) सदर अर्धवेळ दंतचिकित्सक पदाकरीता इच्छुक उमेदवारांनी स्वहस्ताक्षरात अथवा टंकलिखित अर्ज आवश्यक त्या कागदपत्रच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रती जोडून रुग्णालयाच्या कार्यालयात सादर करावा. अर्जावर संपर्क क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

(2) सदर अर्धवेळ दंतचिकित्सक पदावर अर्ज करताना उमेदवाराचे वय 18 वर्षापेक्षा कमी व 58 वर्षापेक्षा जास्त नसावे. वयाची 58 वर्षे पूर्ण केल्यावर उमेदवाराची कंत्राटी तत्वावरील नियुक्ती आपोआप समाप्त होईल.

(3) अर्जसमवेत जोडलेल्या प्रमाणपत्रांची छाननी करुन अर्हताधारक उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

(4) सदर अर्धवेळ दंतचिकित्सक पदावर पात्र उमेदवारांची नेमणूक पूर्णत: कंत्राटी पध्दतीने प्रत्येक 45 दिवसांनी एक दिवस सेवाखंड देउन सहा महिन्यांपेक्षा जास्त नाही इतक्या कालावधीकरीता  किंवा महापलिकेच्या कायमस्वरुपी भरती प्रक्रियेव्दवारे पात्र उमेदवाराची नियुक्ती होईपर्यत यांपैकी जे आधी घडेल तोवरच्या कालावधीसाठी करण्यात येईल.

(5) सदर अर्धवेळ दंतचिकित्सक पदावर कंत्राटी पध्दतीने नेमणुक करण्यात आलेल्या उमेदवारांना दरमहा ठोक मानधन 25,000/- अधिदान करण्यात येईल.

(6) सदर अर्धवेळ दंतचिकित्सक पदावर कंत्राटी पध्दतीने नेमणूक केलेल्या उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास व / अथवा शिक्षा झालेली असल्यास, उमेदवारांनी त्याबाबत प्रतिज्ञापत्र (Notorised Affidavit) देणे बंधनकारक आहे.

(7) सदर अर्धवेळ दंतचिकित्सक पदावर कंत्राटी नेमणूक केलेल्या उमेदवाराने चुकीची महिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

(8) उमेदवारांना अर्धवेळ दंतचिकित्सक पदावर कंत्राटी पध्दतीने सहा महिन्यांपेक्षा जास्त नाही इतक्या कालावधीसाठी नियुक्त केले असल्याने महापलिकेच्या नियमित सेवेमध्ये कायमस्वरुपी नियुक्तीसाठी हक्क अथवा प्राधान्य मागता येणार नाही.

(9) सदर अर्धवेळ दंतचिकित्सक पदावर कंत्राटी पध्दतीने नेमणूक केलेले उमेदवार कंत्राट कालावधीमध्ये महापलिकेच्या सेवेतील नियमित पदांकरीता अनुज्ञेय असलेले लाभ मिळण्यास पात्र ठरणार नाहीत.

(10) सदर अर्धवेळ दंतचिकित्सक पदावर कंत्राटी पध्दतीने केलेले उमेदवार कर्तव्य कालावधीत निवासाचीव्यवस्था अनुज्ञेय असणार नाही.

सदर अर्धवेळ दंतचिकित्सक पदाकरिता निर्धारित सुधारित शैक्षणिक अर्हता व अनुभव अटी व शर्ती**:**

(11) किमान शैक्षणिक अर्हता मान्यताप्राप्त विदयापीठाची बॅचलर्स ऑफ डेंटल सर्जरी पदवी

(12) पदवी प्राप्त झाल्यापंतर सुस्थापित रुग्णालयातील / चिकित्सालयातील विनिर्दिष्ट विषयांतर्गत कामाचा एक वर्षापेक्षा कमी नाही इतक्या कालावधीचा अनुभव असावा.

(13) उमेदवाराची पदवी "महाराष्ट्र राज्य दंत परिषद" यांचेकडे वैध कालावधीकरीता नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

(14) उमेदवारांना मराठी भाषेचे गरजेपूरते ज्ञान असणे आवश्यक आहे. (बोलणे, वाचणे)

(15) उमेदवारांना संगणक प्रचलनाचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र् (डिग्री सर्टीफिकेट, मार्कशिट्स,अटेम्प्ट सर्टीफिकेट इ.), व्यावसयिक अर्हता, संबंधित अनुभवाचे प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्य दंत परिषद नोंदणी प्रमाणपत्र, वयाचा दाखला, निवासाचा दाखला इत्यादी यांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच सदर कागदत्रपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीसाठी मुलाखतीच्या आधी निर्धारीत वेळेत सादर करणे आवश्यक आहे. विभागप्रमुख, रुग्णालय प्रशासनाने निर्धारीत केलेले वरिष्ठ अधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी यांच्या निवडसमिती मार्फत उमेदवारांची चाचणी / मुलाखत दि. 25.08.2022 रोजी दुपारी 2.00 वाजता घेण्यात येईल.

**सदर अर्धवेळ दंतचिकित्सक पदाची ठळक कर्तव्ये व जबाबदा-या:**

- उमेदवार रुग्णालय प्रमुख / त्यांनी नेमून दिलेल्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय अधिकारी यांच्या अखत्यारीत आणि मार्गदर्शनाखाली काम करतील.
- उमेदवारांना नियमांनुसार रुग्णालय प्रशासनाने तयार केलेल्या व रुग्णालय प्रमुख हयांनी मंजुर केलेल्या डयूटी लिस्ट प्रमाणे साप्ताहिक सुट्टीचा लाभ मिळेल.
- उमेदवारांना रुग्णालयात काम करताना संबंधित विभागातील मार्गदर्शक तत्वे व कार्यप्रणालींचे पालन करावे लागेल.

- उमेदवारांनी रुग्ण व त्यांचे नातेवाईक, वरिष्ठ नागरिक, महापालिका वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी व समाजसेवी कार्यकर्त्याशी सौजन्याने वागावे. महानगरपालिकेची व रुग्णालय प्रशासनाची प्रतिमा मलीन होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

- उमेदवाने रुग्णालयात काम करीत असताना महापलिकेचा नियमांचे उल्लंघन केल्यास, काही आक्षेपार्ह वर्तन केल्यास, संबंधित विभागातील कामकाजाबाबत अकार्यक्षमता केल्याचे निदर्शनास आल्यास तसेच रुग्णसेवेमध्ये निष्काळजीपणा केल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवाराला कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

**DOCUMENTS TO BE ATTACHED WITH PROPER APPLICATION**

1. PROPER APPLICATION WITH RECENT PHOTOGRAPH
2. BACHELOR OF DENTAL SURGERY DEGREE CERTRIFICATE
3. BACHELOR OF DENTAL SURGERY ALL YEARS MARKSHEETS
4. BACHELOR OF DENTAL SURGERY REGISTRATION / RENEWAL (WHICHEVER APPLICABLE)
5. AADHAR CARD & PAN CARD
6. MARRIAGE CERTIFICATE
7. GAZETTEN COPY OF CHANGE OF NAME (IF APPLICABLE)
8. NOTORIZED AFFIDVIT ABOUT “COURT CASES, PENDING ENQUIRIES PUNISHMENT” (If applicable)

प्रमुख वैद्यकिय अधिकारी,
सिद्धार्थ म.न.पा. स. सा. रुग्णालय